पुढारी MY कोल्हापूर
मंगळवार, ३ फेब्रुवारी २०२६

# विवेकानंद कॉलेजमधील कार्यशाळेला प्रतिसाद

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेज, भूगोल विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या वतीने जिओ फेस्ट या दोनदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.

कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी भूगोल विषयातील ज्ञानावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या तीन गटांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे बक्षीस देऊन गौरविण्यात आले. त्याचदिवशी सायंकाळी हौशी खगोल अभ्यासक अनिल गवळी यांचे व्याख्यान झाले. आकाश निरीक्षण कार्यक्रमास प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य डॉ. संजय थोरात व डॉ. श्रुती जोशी यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.